**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शनिवार दिनांक ०३ जानेवारी २०२६**

**ठळक बातम्या**

1. **भगवान गौतम बुद्धांचं ज्ञान, त्यांनी दाखवलेला मार्ग हा संपूर्ण मानवतेचा आणि कालातीत असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन.**
2. **महानगरपालिका निवडणुकीसाठी माघारीनंतर नागपुरात ९९२ उमेदवार रिंगणात.**
3. **सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमीत्त आज राज्यासह देशभरातूनत्यांना अभिवादन.**
4. **राज्याच्या पहिल्या महिला पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला सेवानिवृत्/ नवे महासंचालक सदानंद दाते यांनी स्वीकारला पदभार.**

---------------------------------------

पिपरहवा अवशेष

भगवान गौतम बुद्धांचं ज्ञान, त्यांनी दाखवलेला मार्ग हा संपूर्ण मानवतेचा आणि कालातीत आहे. भगवान बुद्ध सर्वांचे आहेत आणि ते सर्वांना जोडून ठेवतात, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज केलं. नवी दिल्लीतल्या राय पिथोरा सांस्कृतिक संकुलात, भगवान बुद्धांशी संबंधित, पवित्र पिपरहवा अवशेषांच्या, भव्य आंतरराष्ट्रीय प्रदर्शनाचं उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते. सव्वाशे वर्षांच्या प्रतीक्षेनंतर हे अवशेष भारतात परत आल्याबद्दल पंतप्रधानांनी आनंद व्यक्त केला.

***(होल्ड बाईट- पंतप्रधान नरेंद्र मोदी)***

***भगवान बुद्ध के पवित्र रेलिक्स को अपने बीच पाकर हम सभी धन्य है। इनका भारत से बाहर जाना और लौटकर फिर भारत आना ये दोनों ही पड़ाव अपने आप में बहुत बड़ा सबक है। सबक ये है कि गुलामी सिर्फ राजनीतिक और आर्थिक नहीं होती। गुलामी हमारी विरासत को भी तबाह कर देती है।***

हे अवशेष भारताबाहेर नेणाऱ्यांसाठी त्या फक्त निर्जीव वस्तू होत्या, म्हणून या वस्तूंचा लिलाव करायचा प्रयत्न त्यांनी केला, पण भारतानं तसं होऊ न देता भगवान बुद्धांच्या कर्मभूमीत हे अवशेष परत आणले, असं प्रधानमंत्री म्हणाले. भगवान बुद्धांशी संबंधित विविध ठिकाणी असलेले त्यांचे अवशेष म्हणजे

त्यांच्या संदेशाचं जिवंत प्रतीक आहे, असं त्यांनी सांगितलं. भारताने हे अवशेष विज्ञान आणि अध्यात्म या दोन्ही दृष्टींनी सांभाळून ठेवले आहेत, तसंच जगभरात अशा प्रकारच्या ठिकाणांच्या विकासासाठी शक्य होईल ते योगदान देण्याचा भारताचा प्रयत्न आहे, असंही पंतप्रधानांनी नमूद केलं.

---------------------------------------

विकसित भारत

२०२५ मधे भारताच्या प्रगतीने जगाचं लक्ष वेधून घेतलं. जगभरात अनिश्चिततेचं वातावरण असताना भारत मात्र आपल्या ध्येयाकडे ठामपणे आणि सातत्यपूर्ण वाटचाल करत राहिला.  या विषयी सविस्तर माहिती आता ऐकुया…

***(व्हीसी -हेमांगी कुलकर्णी ५६ सेकंद)***

***जागतिक बँकेच्या अहवालानुसार भारतात चीन, अमेरिका तसेच जी-७ व जी-२० देशांच्या तुलनेत अधिक सामाजिक समता असून विविध वर्गांतील उत्पन्नातील दरी तुलनेने कमी आहे. कल्याणकारी आणि थेट लाभ हस्तांतरण योजनांमुळे आर्थिक समानतेला चालना मिळाली असून २०२५ मध्ये भारतातील सामाजिक संरक्षण कव्हरेज ६४.३ टक्क्यांपर्यंत वाढले आहे, ज्याचा लाभ सुमारे ९४ कोटी नागरिकांना मिळत आहे. आर्थिक स्थैर्य, संरचनात्मक सुधारणा आणि मजबूत सार्वजनिक वित्त व्यवस्थेमुळे जागतिक गुंतवणूकदारांचा भारतावरील विश्वास वाढत असल्याचे बेटर बिझनेस ब्युरोच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे. दरम्यान, यूपीआय ही जगातील सर्वात मोठी रिअल-टाइम पेमेंट प्रणाली असल्याचा गौरव आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने केला असून, अमूर्त मालमत्ता गुंतवणुकीत भारत जगातील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था असल्याचे जागतिक बौद्धिक संपदा संस्थेने म्हटले आहे.***

***(आकाशवाणीच्या बातम्यांसाठी वृत्त विभागातून मी हेमांगी कुलकर्णी)***

---------------------------------------

नक्षलवादी ठार

छत्तीसगड मध्ये आज दोन वेगवेगळ्या ठिकाणी सुरक्षा दलांशी झालेल्या  चकमकीत एकूण १४ माओवादी मारले गेले. सुरक्षा दलांच्या नक्षलवाद विरोधी मोहिमेला वर्षाच्या सुरुवातीलाच आलेलं हे मोठं यश  मानलं जात आहे. यापैकी बस्तर भागात बिजापूर जिल्ह्यात दोन आणि सुकमा जिल्ह्यात १२ माओवादी मारले गेले. बिजापूर मध्ये बासुगुडा भागात माओवादी असल्याची माहिती मिळताच पोलिसांचं पथक तिथं तातडीनं रवाना झालं. त्यानंतर गगनपल्ली गावाजवळ दोन्ही बाजूंनी झालेल्या

गोळीबारात दोन माओवादी मारले गेले. त्याचप्रमाणे सुकमा जिल्ह्यातही पोलिसांच्या कारवाईत १२ जण मारले गेले.

---------------------------------------

महानगरपालिका निवडणुका

राज्यातल्या महानगरपालिका निवडणुकांमध्ये उमेदवारी अर्ज मागं घेण्याची मुदत काल संपली, त्यानंतर लढतींचं चित्र काल स्पष्ट झालं. अनेक ठिकाणी उमेदवारांना प्रतिस्पर्धी नसल्याने त्यांच्या बिनविरोध निवडीचा मार्ग मोकळा झाला आहे. काही ठिकाणी मुळातच एकमेव अर्ज आले होते, तर काही ठिकाणी छाननीत इतर अर्ज बाद झाल्यानं तिथले एकमेव पात्र उमेदवार बिनविरोध निवडून येणं निश्चित झालं आहे. नागपूर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत एकूण 38 प्रभागांमधून 151 उमेदवारांना निवडून द्यायचं आहे. त्यासाठी अखेरच्या दिवशी काल भाजपाच्या बंडखोरांसह 302 उमेदवारांनी निवडणुकीच्या रिंगणातून माघार घेतली. त्यामुळे आता 151 जागांसाठी 992 उमेदवार निवडणूक लढवणार आहे. चिन्ह वाटप आज करण्यात आलं. त्यानंतरच लहान राजकीय पक्षांसह अपक्ष उमेदवार प्रचाराला सुरवात करू शकतील. झोननिहाय उमेदवारी अर्ज मागे घेतलेल्यांपैकी सर्वाधिक 43 उमेदवारी अर्ज लकडगंज झोन मधून मागे घेण्यात आले तर सर्वात कमी 12 उमेदवारी अर्ज लक्ष्मीनगर झोन मधून मागे घेण्यात आले. राज्यातल्या १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांची निवडणूक फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात होण्याची शक्यता आहे. राज्य निवडणूक आयोग या निवडणुकीचं वेळापत्रक पुढच्या आठवड्यात जाहीर करण्याची शक्यता आहे.

---------------------------------------

एलईडी व्हॅन

अमरावती महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ मध्ये मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी स्वीप कार्यक्रमांतर्गत मतदार जनजागृतीसाठी विशेष एलईडी व्हॅनचा शुभारंभ करण्यात आला. अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांच्या हस्ते झालेल्या या उपक्रमातून शहरातील विविध भागात मतदानाचे महत्त्व व प्रक्रिया याबाबत जनजागृती केली जाणार आहे.

---------------------------------------

सावित्रीबाई फुले जयंती

स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची आज जयंती. त्या निमीत्त आज राज्यासह देशभरातून त्यांना अभिवादन करण्यात येत आहे, तसंच या

निमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सावित्रीबाई फुले यांना त्यांच्या जयंतीनिमित्त आदरांजली वाहिली आहे. सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमीत्त राज्यातही विविध कार्यक्रम होत आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सावित्रीबाई फुले यांना आदरांजली वाहिली. सावित्रीबाईंनी मोठ्या निर्धाराने भिडे वाड्यातील पहिल्या मुलींच्या शाळेत अध्यापनाचे कार्य करत, स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली, भारतातील त्या पहिल्या महिला शिक्षिका होत्या. स्त्री शिक्षण आणि सक्षमीकरणासाठी त्या अहोरात्र झटल्या अशा भावना मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केल्या. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त आज कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आले. कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. बुलढाणा नजीक खामगाव शहरात जलंब रोडवरील सावित्रीबाई फुले भव्य अभ्यासिका व ऐतिहासिक दालनात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. राज्याचे कामगार मंत्री ॲड.आकाश फुंडकर यांच्या हस्ते अभ्यासिका, ग्रंथ आणि ऐतिहासिक नाणे प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले.

***(होल्ड बाईट - आकाश फुंडकर)***

***या रोपट्याचा आता वटवृक्ष व्हायला लागला आहे याचा जो तो असा की याच अभ्यासिकेत अभ्यास केलेले 22 मुलं.या सरकारी नोकरीमध्ये जॉईन होतात आहे म्हणून त्यांचा गौरव हा त्यांच्या जयंतीच्या दिनी करणं आवश्यक होतं हीच खरी मानवंदना व सावित्रीबाई फुलेंना राहणार आहे.म्हणून आजचा हा गुणगौरव सोहळा आहे.***

या कार्यक्रमात सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्यावरील चित्रफीत व दुर्मिळ वस्तूंची भव्य प्रदर्शनी आयोजित करण्यात आली असून नागरिकांची मोठी गर्दी पाहायला मिळत आहे. भारतातील पहिल्या शिक्षिका, भारतीय स्त्रीमुक्ती चळवळीच्या आद्य प्रणेत्या आणि आद्य आधुनिक विद्रोही मराठी कवयित्री सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त महावितरणतर्फे त्यांना अभिवादन करण्यात आले.

---------------------------------------

रश्मी शुक्ला

राज्याच्या पहिल्या महिला पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला आज सेवानिवृत्त झाल्या. पोलीस दलात साडे ३७ वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करणाऱ्या शुक्ला यांना मुंबईत भोईवाडा इथल्या पोलीस मैदानात मानवंदना देण्यात आली. त्यानंतर शुक्ला यांनी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची वर्षा निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली. त्यांच्या यशस्वी कारकिर्दीबद्दल मुख्यमंत्र्यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या. राज्याचे नवनियुक्त पोलीस महासंचालक सदानंद दाते यांनी आज रश्मी शुक्ला यांच्याकडून आपल्या पदाचा कार्यभार हाती घेतला. तत्पूर्वी त्यांनीही मुख्यमंत्र्यांची सदिच्छा भेट घेतली. त्यांच्या नियुक्तीबद्दल अभिनंदन करत मुख्यमंत्र्यांनी त्यांना कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. दहशतवाद विरोधी पथक, एनआयए, सीबीआय, सीआरपीएफ अशा महत्त्वाच्या संस्थांमधल्या कामाचा प्रदीर्घ अनुभव असलेले सदानंद दाते भारतीय पोलीस सेवेच्या १९९० च्या तुकडीतले अधिकारी आहेत.

---------------------------------------

बीसीसीआय

भारतीय क्रिकेट नियामक मंडळ - बीसीसीआयनं कोलकाता नाईट रायडर्सला आयपीएल २०२६ च्या आधी बांगलादेशचा वेगवान गोलंदाज मुस्तफिजूर रहमानला त्यांच्या संघातून काढून टाकण्यास सांगितलं आहे. चेन्नई सुपर किंग्ज आणि दिल्ली कॅपिटल्सशी झालेल्या चुरशीच्या स्पर्धेनंतर गेल्या महिन्यात झालेल्या खेळाडूंच्या लिलावात कोलकाता नाईट रायडर्सनं ३० वर्षीय डावखुरा गोलंदाज मुस्तफिजूर रहमानला ९.२ कोटी रुपयांना खरेदी केलं आहे. गरज पडल्यास कोलकाता नाईट रायडर्सला बदली खेळाडूची निवड करण्याची परवानगी दिली जाईल असं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

---------------------------------------

हवामान

नागपूरसह विदर्भात एकूणच किमान तापमानात वाढ नोंदवण्यात आली आहे. नागपुरात कालपासून ढगाळ वातावरणामुळे किमान तापमान आज 14.5 अंश सेल्सिअस इतकं नोंदवण्यात आलं, तर विदर्भात सर्वात कमी किमान तापमान भंडारा इथं १२ अंश सेल्सिअस इतकं नोंदविण्यात आलं आहे. उर्वरित सर्व जिल्ह्यांमध्ये तापमान 12 ते 16 अंश सेल्सिअस दरम्यान आहे. आगामी सात जानेवारीपर्यंत हवामान कोरडं राहणार असल्याचा अंदाज नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवला आहे.

---------------------------------------